# तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, पुणे

## ४१२,E शिवाजीनगर, पुणे ४११ ०१६.

☏ २५६५६२३४, फॅक्स २५६५६२३४, E-mail : ropune.dte@gmail.com

---

**अत्यंत तातडीचे/फॅक्सद्वारे**

जा.क्रं.विकापु/आस्था-०१/२००९/ ४६९८ दिनांक ५/५/२००९ 5 MAY 2009

प्रति,

सर्व प्राचार्य,
शासकीय अभियांत्रिकी व औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालय कराड
शासकीय तंत्रनिकेतन पुणे/कराड/कोल्हापूर/सोलापूर/मिरज/अवसरी/
शासकीय दूरशिक्षण तंत्रनिकेतन पुणे
म.रा.हॉटेल मॅनेजमेंट ॲन्ड केटरिंग टेक्नॉलाजी पुणे
उपसचिव, म.रा. तंत्रशिक्षण मंडळ वि.का.पुणे
संचालक, अभियांत्रिकी महाविद्यालय, पुणे

**विषयः- तंत्रशिक्षण संचालनालयाच्या अधिपत्याखालील सर्व शासकीय आस्थापने वर कार्यरत अधिकारी कर्मचा-यांची माहिती संगणकीय करणेबाबत**

संदर्भः- १)संचालक, तंत्रशिक्षण मुंबई यांचे पत्र क्रं. ४/आस्था/२००९/७६५ दिनांक २६/०३/२००९
२) तंत्रशिक्षण संचालनालय मुंबई यांचा दि. ५-५-२००९ रोजीचा दूरध्वनी

तंत्रशिक्षण संचालनालयाच्या अधिपत्याखालील सर्व शासकीय संस्था व विभागीय कार्यालये तसेच म.रा. तंत्रशिक्षण मंडळ व त्यांची विभागीय कार्यालये यात कार्यरत असलेल्या अधिकारी/ कर्मचा-यांची माहिती EMIS स्वॉफटवेअर मध्ये भरण्या बाबत आपणांस या पुर्वी वारंवार कळविण्यात आले आहे. त्या अनुषगाने संदर्भाधिन पत्रान्वये वर नमूद केलेल्या काही सूचना नव्याने देण्यात आलेल्या होत्या व प्रथम प्राधान्याने अचूक माहिती दि. ३०/३/२००९ पर्यंत कोणत्याही परिस्थिती भरण्याबाबत कळविण्यात आले होते. तसेच माहिती अचूक व पूर्णपणे भरल्याचे प्रमाणपत्र या कार्यालयास पाठविण्या विषयी कळविण्यात आले होते. परंतु काही संस्थांनी अद्यापर्यंत माहिती अचूक व पूर्णपणे भरल्याचे प्रमाणपत्र सादर केलेले नाही. त्याचप्रमाणे बऱ्याच संस्थांनी माहिती अपूर्ण भरलेली आहे असे मुख्य कार्यालयाकडून संदर्भाधिन दूरध्वनीवरुन या कार्यालयास निदर्शनास आणून देण्यात आले आहे.

. नियतकालीक बदल्यांचे अनुषंगाने वर्ग १ व २ मधील अधिका-यांची माहिती मा. सचिव उच्च व तंत्रशिक्षण मंत्रालय मुंबई यांना तातडीने सादर करावयाची आहे त्यामुळे ती अद्ययावत असणे आवश्यक आहे तरी आपले संस्था/ कार्यालयात कार्यरत असलेल्या वर्ग १ ते ४ अधिकारी/कर्मचारी यांची माहिती अपूर्ण असल्यास ती आजच म्हणजे दिनांक ५-५-२००९ रोजी भरण्यात यावी. **तसेच आपले कार्यालयात/संस्थेत कोणताही अधिकारी /कर्मचारी यांची माहिती भरण्याचे शिल्लक राहिले नसून सर्व माहिती बिनचूक व पूर्णपणे भरण्यात आली आहे असे प्रमाणित करुन या कार्यालयास फॅक्सद्वारे पाठविण्यात यावे.** याबाबत माहिती अपूर्ण किंवा चुकीची असल्यास संबधित संस्थाप्रमुखांस जबाबदार धरण्यात येईल याची कृपया नोंद घ्यावी. माहिती भरण्यास काही अडचण असल्यास मुख्य कार्यालयातील श्री पाटील सिस्टीम ॲनॉलिस्ट यांचेशी दूरध्वनी क्रं. ०२२ २२६४४८५९ किंवा ९८९२८६८८०३ या क्रमांकावर संपर्क साधावा.

5-5-09

प्र.सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय पुणे

प्रत- मा. संचालक, तंत्रशिक्षण मुंबई यांना माहितीसाठी सादर
प्रत- प्रोग्रॅमर तंत्रशिक्षण वि.का.पुणे यांना संकेतस्थळावर प्रदर्शित करण्यासाठी
प्रत- आस्था३ब/४ यांना आवश्यक कार्यवाहीसाठी

F:\Misc\RO Pune.doc/20